मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

शुक्रवार दिनांक ०३/०५/२००२ रोजी झालेल्या ७७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ७७ वी बैठक शुक्रवार दि.०३/०५/२००२ रोजी सकाळी ११.३० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१.	मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर	सभापती
२.	श्री.एस्.एस्.झेंडे	मुख्य अधिकारी
३.	मा.श्री.सचिन मा.सावंत	सदस्य
४.	मा.श्री.विश्वास मोकाशी,	सदस्य
५.	मा.श्री.गजेंद्र लष्करी	सदस्य
६.	मा. श्री. रघुनाथ थवई	सदस्य
७.	मा.श्री. कमरुद्दीन मर्चंट	सदस्य
८.	मा.श्रीमती छाया कल्याणी	सदस्या
९.	मा.श्री.रमेश परब	सदस्य
१०.	मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई)	सदस्य
११.	मा.श्री.मोहन देसाई	सदस्य
१२.	मा.श्री.बाप्पा सावंत	सदस्य
१३.	मा. श्री. संजय शिर्के	सदस्य
१४.	मा. श्री. अबुबकर मूसा बाटलीवाला	सदस्य
१५.	प्रमुख अभियंता, म.न.पा. हयांचे प्रतिनिधी	निमंत्रक

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन सचिवाना बैठकीस सुरवात करण्याच्या सूचना दिल्या. तद्नुसार सचिवांनी बैठकीस सुरवात करण्यापूर्वी श्री.व्यास उप सचिव, महाराष्ट्र शासन हे आजच्या बैठकीस पूर्व नियोजित बैठकीमुळे उपस्थित राहू शकत नसल्याचे त्यांच्या कार्यालयाने कळविल्याचे सांगून बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ७७/१

विषय- दि.०३.०४.२००२ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ७६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मुं.इ.दु. व पु. मंडळाच्या दि. ०३.०४.२००२ रोजी संपन्न झालेल्या ७६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ६३ वर सादर करण्यात आला आहे.

मा.सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी हयाबाबत अशी सूचना केली की,त्यांची नगरसेवक म्हणून नियुक्ती झाली असल्याने कार्यसूचीतील कार्यवृत्तांत नमूद केल्यानुसार म.न.पा.तर्फे वसुल केला जाणा-या दुरुस्ती उपकरापोटी निधी मंडळाकडे त्वरित हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने ते म.न.पा. आयुक्त हयांच्याबरोबर एक बैठक घेण्याचा प्रयत्न करणार असून हया बैठकीस मा. सभापती, मा. मुख्य अधिकारी हयांनी उपस्थित राहावे. हया बैठकीस, उपकरप्राप्त इमारतीत राहणा-या नगरसेवकांनाही आपण निमंत्रित करु व दुरुस्ती उपकराची थकबाकी मंडळास त्वरित देण्याबाबत चर्चा करु.

तद्नंतर उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे निदर्शनास आणले की, हया कार्यवृत्तांतातील पृ.क्र. ३३ वर इ.क्र.८६-११०, ९४ए, ९४बी, टी.बी.कदम मार्ग हया कामाच्या निविदेबाबत असा उल्लेख केला आहे की, हया निविदेबाबत कार्यवृत्तांत नमूद केलेल्या सर्व मुद्यांचा समावेश करुन सविस्तर टिपणी प्राधिकरणाकडे मुख्य अभियंता-२/प्रा. हयांच्यामार्फत पाठविण्याचे ठरले होते. वास्तविकतः हयाबाबत मा. सभापती हे प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये हा विषय उपस्थित करणार होते व त्यानुसार हया प्रकरणाची सविस्तर टिपण्णी करुन ती मा. सभापती हयांना देण्यात आली होती व त्यांनी हयाबाबत प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर सदर बैठकीमध्ये अंतिमतः असा निर्णय घेण्यात आला की, प्राधिकरणाच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी. तद्नुसार मा. सभापती व मा.मुख्य अधिकारी हयांची परवानगी घेऊन फेरनिविदा मागविल्या आहेत व त्या दि. २.५.२००२ रोजी उघडण्यात आल्या आहेत.

मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि. ३.४.२००२ रोजीच्या बैठकीत ज्या पुनर्विकासाच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली होती त्यापैकी इ.क्र.४ धसवाडी, ठाकूरव्दार “मानकर हाऊस” हया इमारतीबाबत काही तक्रारी आहेत. त्यामुळे हया प्रस्तावाबाबत योग्य ती खबरदारी घेण्याची सूचना मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी केली.

हयाबाबत सचिव हयांनी असे प्रतिपादन केले की, आपण हया प्रस्तावात ना.ह.प्र. पत्र प्रदान केलेले आहे. परंतु जेव्हा हया प्रस्तावांतर्गत होणा-या नवीन इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देण्याचा मुद्दा उपस्थित होईल त्यावेळी योग्य ती काळजी घेतली जाईल.

हयाबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की,जर हया प्रस्तावाबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या असतील तर त्याची शहनिशा त्वरित करण्यात येईल.

तदनंतर मा. सभापती हयांनी असे निदर्शनास आणले की, कार्यवृत्तांतातील पृ.क्र.२७ वरील ठराव क्र. ७६/५८३ नुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या कलम ९४ मधील पोट कलम ५ व ६ अन्वये पुनर्रचित इमारतीतील गाळयांचें भोगवटाधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अभिहस्तांतरण करण्याचा प्रस्ताव मा. गृहनिर्माण मंत्री हयांच्याबरोबर झालेल्या बैठकीतील मुद्यांच्या आधारावर प्राधिकरणापुढे निर्णयासाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली होती. हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया विषयावर आता पुन्हा मा. मंत्री (गृहनिर्माण) हयांच्या स्तरावर बैठक होणार असल्याने तूर्त हा प्रस्ताव प्राधिकरणास सादर न करता स्थगित ठेवावा. मा. मंत्री (गृहनिर्माण) व शासन स्तरावर हयाबाबत चर्चा झाल्यानंतर त्या चर्चेतील मुद्यांच्या आधारावर हा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीपुढे फेर सादर करावा.

हयाबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, हया विषयबाबत शासन स्तरावर जो निर्णय होईल त्यानुसार कार्यवाही करावी. आपण ज्या ३२८ इमारती पुनर्रचित केल्या आहेत त्या मालकी तत्वावर करण्यास काहीच हरकत नाही. हयाबाबत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत असा प्रश्न निर्माण झाला होता की, हया इमारती मालकी तत्वावर केल्यास इमारतींवरील करांचा बोजा त्यामध्ये राहणा-या रहिवाशांना परवडणारा नाही व त्यामुळे हया इमारती मालकी तत्वावर करण्यास रहिवाशांचा विरोध राहील. म्हाड अधिनियम १९७६ च्या सुधारित तरतुदीनुसार हया इमारती रहिवाशांच्या सह.गृह.संस्थांना मालकी तत्वावर हस्तांतरित करणे बंधनकारक आहे. परंतु आत हया विषयावर मा. मंत्री (गृहनिर्माण) हयांच्या स्तरावर बैठक होणार असल्याने तूर्त हा प्रस्ताव आपण स्थगित ठेऊ.

मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी असे मत प्रदर्शित केले की, हया प्रस्तावाबाबत जो निर्णय होईल त्यामुळे मंडळाचे आर्थिक नुकसान न होण्याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. यावर मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, आजमितीस मंडळाचे आर्थिक नुकसान होतच आहे.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारती मालकी तत्वावर करणे हे गरजेचे आहे. आपण स्वतः इमारती पुनर्रचित केल्यानंतर त्यांची देखभाल आपण किती दिवस करणार हा मुद्दा विचार करण्यायोग्य आहे. ज्या इमारती नव्याने पुनर्रचित झाल्या आहेत त्या आपण मालकी तत्वावर करीत असून त्यास प्रतिसादही चांगला मिळत आहे. परंतु ज्या इमारती पूर्वी पुनर्रचित झाल्या आहेत त्या इमारती कोणीही मालकी तत्वावर घेण्यास तयार नाही. हा राजकीय प्रश्न असून त्यावर गांभीर्याने व आर्थिक बाबींचा विचार न करता रहिवाशांच्या हिताच्या दृष्टीने शासनातर्फे त्याबाबत निर्णय घेतले जातात. त्यामुळे हया प्रस्तावावर आपण निर्णय घेण्यापेक्षा शासन स्तरावर निर्णय घेणे उचित ठरेल. शासनाच्या निर्णयानंतर हया प्रस्तावावर आपण विचार करु.

हयाबाबत मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी असे मत प्रदर्शित केले की, मंडळाचे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने आपल्या मंडळाची भूमिका शासनास स्पष्टपणे सांगणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत, मंडळाचे जर आर्थिक नुकसान होत असेल तर अशा नुकसानीचा भार हा शासनाने सोसणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री मोहन देसाई हयांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित इमारतींच्या देखभालीचा खर्च हा संबंधित इमारतीतील गाळयांच्या भाडयामध्ये वाढ करुन वसूल केल्यास मंडळाचे त्यात आर्थिक नुकसान होणार नाही.

हयाबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित इमारतींच्या गाळयांच्या भाडे वाढीचा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. मंडळाने आतापर्यंत पुनर्रचित केलेल्या इमारतींमध्ये साधारणतः २३००० गाळे आहेत. हया २३००० गाळयांपोटी आपण म.न.पा.कर, पाणीपट्टी, विज देयके हयांसाठी आपण प्रतिवर्षी ११ कोटी रुपये खर्च करतो. मात्र गाळयांचे भाडे व सेवाआकारापोटी मंडळाला फक्त ५.५० ते ६.०० कोटी रुपये मिळतात. त्यामुळे प्रतिवर्षी मंडळाचे ५.०० ते ५.५० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे ना नफा ना तोटा हया तत्वाचा वापर करण्याची जर मंडळाची भावना असेल तर त्यादृष्टीने प्रति

चौ.फू. दराने भाडयाची वसूली करावी जेणेकरुन जेवढा खर्च मंडळाचा होतो तेवढया रक्कमेची वसूली करता येणे शक्य होईल.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी मुख्य लेखाधिकारी हयांना असे आदेश दिले की, उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांची मदत घेऊन व मा. सभापती व त्यांच्याशी सविस्तर चर्चा करुन प्रति चौ.फू. दराच्या आधारावर भाडे वाढीचा प्रस्ताव तयार करुन तो मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्याबाबत निर्णय घेऊ. आपणांकडे सर्व सांख्यिकी माहिती उपलब्ध असून त्या माहितीनुसार किती प्रति चौ.फूट दर निश्चित करावा लागेल हयाबाबत सविस्तर माहिती (दुरुस्ती खर्च मिळून) तयार करावी, जेणेकरुन त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेता येईल.

हयाबाबत मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी असे मत प्रदर्शित केले की, ज्यावेळी सर्वपक्षीय आमदारांची बैठक होईल त्यावेळी हया पुनर्रचित इमारतींच्या दुरुस्तीसाठी आमदार निधी देण्याची तरतूद करण्याच्या दृष्टीनेही विचार व्हावा.

मुख्य अधिकारी हयांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, आमदार निधी हा फक्त उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी दिला जातो. मागील वर्षी उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी आमदार निधी अंतर्गत १२.५० कोटी रुपये मिळाले होते. आमदार निधी हा पुनर्रचित इमारतींच्या दुरुस्तीसाठी देण्याची तरतूद नाही. कारण आमदार निधी बाबत मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हयांची जी मार्गदर्शक तत्वे आहेत त्यानुसार पुनर्रचित इमारतींच्या दुरुस्तीसाठी आमदार निधी मंजूर करता येत नाही. उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी जो आमदार निधी वापरला जातो त्यास निवासी लेखा परिक्षकांनी आक्षेप घेतलेले आहेत. त्यांच्या आक्षेपानुसार आमदार निधी अंतर्गत देण्यात येणारा पैसा हा सुध्दा शासनाचाच असल्याने प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील तरतुदींनुसार रु.१०००/- प्रति चौ.मी. पेक्षा जास्त खर्च आमदार निधी अंतर्गतही करता येत नाही.

चर्चेच्या अखेरीस मुख्य अधिकारी हयांनी असे मत प्रदर्शित केले की, मा. सभापती हयांनी सुचविल्यानुसार पुनर्रचित इमारती सह.गृह.संस्थांना मालकी हक्कावर हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे न पाठवता तूर्त स्थगित ठेऊ व तशी कार्यवृत्तांतामध्ये नोंद घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

वरील सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

....

उत्तर परिमंडळ

बाब क्रमांक : ७७.२

(अ) विषय-इ.क्र.७१९, जगदीश भवन, कात्रक रोड, वडाळा या इमारतीवर सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी प्रदान करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.६५ ते ६७ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून वा.शा. नी सादर केलेल्या अंतिम देयकानुसार हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेला खर्च हा मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा रु. ६२७०२/- अधिक झालेला आहे. तसेच तो प्रशासकिय मान्यतेपेक्षा २१.५३ टक्के अधिक आहे. तथापि, एकूण दुरुस्तीसाठी झालेला खर्च प्रमाणित मर्यादा रु. १०००/- प्रति चौ.मी. पेक्षा कमी आहे. त्यामुळे सुधारित प्रशासकीय मंजूरी देणे आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती दुरुस्ती कामावर झालेल्या प्रत्यक्ष खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

(ब)विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.६९ ते १५३ वर सादर करण्यात आले आहेत.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील ८, फग/द विभागातील ६, व फग/ऊ विभागातील १७ अशा एकूण ३१ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील वरील एकूण ३१ इमारतींच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७७/५८७

(अ) इ.क्र.७१९, जगदीश भवन, कात्रक रोड, वडाळा या इमारतीच्या दुरुस्तीच्या पहिल्या टप्प्यासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च रु. ३५३८८५/- (रु.९५९.३२ प्रती चौ.मी. दराने) सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

(ब) उत्तर परिमंडळातील एकूण ३१ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-अ"** नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

दक्षिण परिमंडळ

बाब क्रमांक :७७.३

(अ) विषय-**नियंत्रण कक्षात उपकरप्राप्त इमारतींच्या पडझडीविषयी प्राप्त झालेल्या संदेशांची माहिती.**

दि. २.४.२००२ ते दि. २६.४.२००२ हया कालावधीत मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या पडझडीबाबत मंडळाच्या नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशांची माहिती पृ.क्र.१५५ वर सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

हयाबाबत मा. सदस्य, श्री गजेंद्र लष्करी हयांनी अशी विचारणा केली की, दोन दिवसापूर्वी खेतवाडी विभागात एका उपकरप्राप्त इमारतीची पडझड होऊन दोन व्यक्ती जखमी झाल्या होत्या. त्यांना हरकिशनदारस भाटीया रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. त्या जखमी व्यक्तींची सद्यःस्थिती कशी आहे? हयाबाबत मा. सदस्य, श्री कमरुद्दीन मर्चंट हयांनी अशी विचारणा केली की,हया अपघातांमध्ये नक्की काय घडले आहे. तद्नुषंगाने कार्यकरी अभियंता/डी-२ विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या बाल्कनीच्या गिलाव्याचा थोडासा भाग इमारतीला लागून असलेल्या रस्त्यावर पडला. त्यावेळी हया रस्त्यावरुन जाणा-या दोन व्यक्ती जखमी झाल्या आहेत. दोन जखमी व्यक्तींपैकी एका महिलेच्या पायाला किरकोळ दुखापत झाली होती. तिला आवश्यक औषधोपचारानंतर रुग्णालयातून सोडून देण्यात आले आहे. दुसरी जखमी व्यक्ती अद्याप रुग्णालयात असून औषधोपचार चालू आहेत. त्याबाबत चिंता करण्यासारखे काहीच कारण नाही. हया दोन्ही व्यक्ती संबंधित इमारतीतील नसून पादचारी होत्या. हया इमारतीच्या दुरुस्तीचे काम १२ वर्षापूर्वी करण्यात आलेले होते. पडलेल्या भागाची दुरुस्ती चालू नव्हती.

यावर मा. सदस्य, श्री रघुनाथ थवई हयांनी असे निदर्शनास आणून दिले की, हया अपघाताबाबतची माहिती त्यांना नियंत्रण कक्षामार्फत देण्यात आलेली नाही. तथापि, मा. सदस्य, श्री गजेंद्र लष्करी व इतर सन्मा. सदस्यांनी, त्यांना हया अपघाताबाबतचा संदेश प्राप्त झाल्याचे सांगितले. हयाबाबत उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, सर्व सन्मा. सदस्यांना वेळोवेळी अपघाताची माहिती देण्याबाबत काळजी घेतली जाईल.

वरील सविस्तर चर्चेअंती सर्वांनी मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या पडझडीच्या अहवालाची नोंद घेतली.

बाब क्रमांक : ७७.३

(ब) विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. १५७ ते १९५ वर सादर करण्यात आले आहेत.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील ए विभागातील ३, बी विभागातील १, सी१-२ विभागातील ४, सी३-४ विभागातील २, डी-१ विभागातील २ व डी-२ विभागातील १ असे एकूण १३ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय मा. सदस्य श्री गजेंद्र

लष्करी हयांनी सुचविल्यानुसार आयत्यावेळच्या विषयात ए विभागातील इ.क्र.१३१, एन्.एस.रोड हया इमारतीच्या दुरुस्तीचे सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले आहे.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण १४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७७/५८८

दक्षिण परिमंडळातील एकूण १४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-ब"** नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

पुनर्रचना विभाग

बाब क्रमांक :७७/४

विषय- इ.क्र.४०६-४१२, पारसीवाडा, ना.म.जोशी मार्ग, सी.एस. नं.२/६१,ग/द विभाग, लोअरपरेल विभाग या योजनेच्या कामाच्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृ.क्र. १९७ ते २०७ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया कामासाठी सर्वात कमी दराची निविदा मे.सी.बी.अँड सन्स हयांची असून.त्यांच्या निविदेचा दर हा निविदा रक्कम रु. ८७,३४,८५२/- पेक्षा ११.०० टक्के कमी आहे. मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी विचारणा केल्यानुसार निम्नतम दराची निविदा भरण्याबाबतची कारणे विषद करताना उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, हा भूखंड रिकामा असून ही जागा मुख्य रस्त्यालगत आहे. त्यामुळे हयाठिकाणी बांध्काम साहित्याचा साठा करणे शक्य आहे. हयाशिवाय सद्यः ठेकेदाराकडे इतर कामे नाहीत. त्यांच्याकडे काम करणारा मजूर वर्ग हा त्यांचा स्वतःचा कायमस्वरुपी असल्याने त्यांना काम देणे आवश्यक आहे जेणेकरुन त्यांच्या वेतनाचा मोबदला त्यांना काम करवून घेता येईल.

हयाबाबत मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, ही निविदा स्विकृत करण्यास काहीच हरकत नाही परंतु अशा कमी दराच्या निविदांच्या कामावर वास्तुशास्त्रज्ञांचे निरिक्षण फार महत्वाचे आहे. हया इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम ब-याच वर्षापासून रखडलेले आहे. ही योजना अगदी मुख्य रस्त्याला लागून असल्याने त्याठिकाणी अतिशय चांगली योजना होऊ शकते. हया जागेच्या बाजूला एक मंत्री हाऊस नावाची एक नवीन इमारत झालेली आहे. हया इमारतीच्या तुलनेने आपणही चांगली इमारत बांधू. हयामुळे त्या विभागात उपकरप्राप्त इमारतीमध्ये राहणा-या रहिवाशांना असा विश्वास निर्माण होईल की, दुरुस्ती मंडळ हे देखील चांगल्या नवीन इमारतींची निर्मिती करु शकते, ज्यामुळे आपल्याला त्या विभागातील रहिवाशांचा पुनर्रचना योजनेस प्रतिसाद मिळण्यास मदत

होईल. त्यामुळे हया इमारतीच्या पुनर्रचना कामात वास्तुशास्त्रज्ञांनी चांगली देखरेख ठेऊन उत्तम दर्जाच्या इमारतीची निर्मिती करण्याबाबत दक्ष राहणे आवश्यक आहे. पिंपळेशवर कृपा हया इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामाबाबत वास्तुशास्त्रज्ञांनी आपल्याला वेळोवेळी माहिती न पुरविल्याने त्याबाबत मंडळावर आरोप होतात. डिलाईल रोड हया भागात आपण ब-याचशा पुनर्रचना योजना कार्यान्वित करु शकतो, परंतु त्यासाठी तेथील रहिवाशांचा विश्वास संपादित करणे आवश्यक आहे. कारण पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत हया भागात ज्या इमारती पुनर्रचित झाल्या आहेत त्यांच्या कामाचा दर्जा चांगला नसल्याने हया भागातील रहिवाशी आपल्या पुनर्रचना योजनेबाबत साशंक अहेत. त्यामुळे हया भागातील रहिवाशांचा विश्वास संपादित करण्याच्या दृष्टीने आपण हया ठिकाणी चांगल्या दर्जाच्या इमारतीची निर्मिती करणे आवश्यक आहे. आपण हया भागातील **पटेल बिल्डिंग** नावाने ओळखल्या जाणा-या इमारतीतील रहिवाशांचा विश्वास संपादित केला आहे परंतु दुर्देवाने आपण चार महिन्यांपासून रहिवाशांच्या जागा जबरदस्तीने खाली करुन घेऊनही हया इमारतीतील ७-८ दुकानदारांमुळे ही योजना मागील चार महिन्यांपासून रेंगाळलेली आहे. हे जर असेच होत राहिले तर मग रहिवाशी आपणांस इतर योजनांबाबत सहकार्य करतील किंवा नाही हयाबाबत शंका वाटते. अशाच प्रकारे बोरी व इराणी चाळ हया पुनर्रचना योजनेचे प्रकल्प आपल्या हातून गेले आहेत. वाणी चाळीचा प्रकल्प आहे परंतु तोही आपण यामुळेच करु शकत नाही. रहिवाशांची अशी भूमिका आहे की, काही झाले तरी मंडळाच्या पुनर्रचना योजनेस सहकार्य करावयाचे नाही. अशा परिस्थितीत कसे काम करावयाचे हा प्रश्न आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, पटेल बिल्डिंगबाबत दुकानदारांनी आपल्या योजनेस विरोध केला आहे. हया इमारतीबाबत मागे मा. अध्यक्ष/प्रा. हयांच्याबरोबर बैठक झाली होती. त्यांच्या दुकानाचे प्रत्यक्ष व व्हेकेशन नोटीसमध्ये क्षेत्रफळ दर्शविले आहे त्यामध्ये बरीच तफावत आहे. तसेच त्यांच्या दुकानांना दोन दरवाजे असल्याने ते दोन दोन दुकाने पुनर्रचित इमारतीत देण्याचा आग्रह धरीत आहेत. हयाबाबत त्यांना समजावण्याचे प्रयत्न चालू आहेत.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, दुकानदारांना समजावण्यात बराच कालावधी अगोदरच गेला आहे. का.अ. श्री. नलावडे व श्री. पालीवाल हे संयुक्त पाहणी करणार होते परंतु अद्याप काहीच कार्यवाही झालेली नाही.

हयाबाबत का.अ./पु.वि.३ हयांनी असे प्रतिपादन केले की, त्यांनी का.अ./फग (द) विभाग हयांच्याबरोबर संयुक्त पाहणी पूर्ण केली असून व्हेकेशन नोटीसमध्ये नमूद केलेल्या क्षेत्रफळात दुरुस्ती का.अ./फग (द) विभाग हयांनी करणे आवश्यक आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर) श्री.झालपूरी हयांनी असे प्रतिपादन केले की, ही मालमत्ता मंडळाने संपादित केलेली आहे. मालमत्ता संपादित झाल्यानंतर व्हेकेशन नोटीसमध्ये जे काही फेरफार करावयाचे असतात ते पुनर्रचना विभागानेच करावयाचे असतात. अशाप्रकारचे फेरफार पुनर्रचना विभागातर्फे पूर्वीही करण्यात आलेले आहेत. का.अ./फग (द) विभाग व का.अ./पु.वि.३ विभाग हयांनी संयुक्त पाहणी करुन क्षेत्रफळाची तपासणी केलेली आहे. त्यामुळे व ही मालमत्ता मंडळाने

संपादित केलेली असल्याने व्हेकेशन नोटीसमध्ये जे काही फेरफार करावयाचे आहेत ते पुनर्रचना विभागानेच करणे आवश्यक आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) श्री.वणीकर हयांनी असे प्रतिपादन केले की, मालमत्ता जरी मंडळाने संपादित केलेली असली तरी व्हेकेशन नोटीस ही ज्या कार्यालयातर्फे दिली गेलेली असते त्या कार्यालयासच व्हेकेशन नोटीसमध्ये फेरफार करण्याचे अधिकार असतात. ही पध्दत मागील ३० वर्षापासून चालू आहे. हया प्रकरणात का.अ./पु.वि.३ व का.अ./फग (द) विभाग हयांनी जरी संयुक्त पाहणी केली असली तरी क्षेत्रफळ का.अ./फग (द) विभाग हयांनी अद्याप प्रमाणित केलेले नाही.

मुख्य अधिकारी हयांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, हयाबाबत पूर्वीच्या मुख्य अधिकारी हयांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार एकदा उपकरप्राप्त इमारत प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित केल्यानंतर संबंधित इमारत ही पुनर्रचना विभागाकडे वर्ग होते.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित केलेली इमारत जरी पुनर्रचना विभागाकडे वर्ग होत असली तरी व्हेकेशन नोटीसमध्ये फेरफार करण्याचे अधिकार हे ज्या कार्यालयाने व्हेकेशन नोटीस दिलेली असते त्याच कार्यालयास असतात.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर.) हयांनी असे प्रतिपादन केले की, व्हेकेशन नोटीसबाबत एक समिती नेमण्यात आलेली होती व हया समितीने देखील व्हेकेशन नोटीसमध्ये फेरफार केलेले आहेत. मंडळाने संपादित केलेल्या मालमत्तेचा दुरुस्ती विभागाशी काही संबंध नसतो. अशा इमारतींबाबतची सर्व कार्यवाही पुनर्रचना विभागाने करावयाची असते.

हयाबाबत मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, संयुक्त पाहणी करुन क्षेत्रफळाची फेरमोजणी केली असल्याने क्षेत्रफळ दोन्ही विभागाने संयुक्तरित्या प्रमाणित करण्यास काहीच हरकत नसावी. अन्यथा योजना आणखी सहा महिने रखडून जाईल.

हयाबाबत सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, सध्याच्या पध्दतीनुसार उपकरप्राप्त इमारत प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित केल्यानंतर संबंधित इमारतीची नस्ती दुरुस्ती विभागाने पुनर्रचना विभागाकडे हस्तांतरित करावयाची असते व तदनंतर व्हेकेशन नोटीसमध्ये जे फेरफार करावयाचे असतात ते पुनर्रचना विभागाने करावयाचे असतात अशा स्वरुपाचे आदेश तत्कालिन मुख्य अधिकारी हयांनी दिलेले असून हे आदेश सद्यः अस्तित्वात आहेत.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अधिका-यांबरोबर समन्वय बैठक घेऊन आपण नव्याने परिपत्रक काढू. क्षेत्रफळाच्या मुद्दयावर रहिवाशी न्यायालयात जाऊन पुनर्बांधणी योजनेला अडथळा निर्माण करतात त्यामुळे क्षेत्रफळाबाबत वाद निर्माण होऊ नये यासाठी आपणांस योग्य ती काळजी घ्यावीच लागेल.

मा.सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, पटेल बिल्डिंगची पुनर्रचना योजना ७-८ दुकानदारांमुळे गेल्या चार महीन्यांपासून रखडली आहे. त्यामुळे येथून पुढे तळमजला तसाच न ठेवता तो पाडण्याबाबत आपल्याला विचार करावा लागणार आहे. अशाच एका प्रकरणामध्ये इमारत अतिशय धोकायदायक असून इमारतीचा मालक सदर इमारत दुरुस्तही करीत नाही तसेच प्रमाणित मर्यादेवरील जादा रक्कमही भरत नाही. ही इमारत केव्हा लवकरात लवकर पडेल अशी त्याची इच्छा असून इमारत पडल्यानंतर मंडळामार्फत इतर रहिवाशांना संक्रमण शिबीरात जागा दिल्या जातील हयाची इमारत मालक वाट पहात आहे. हया इमारत मालकाचे तळ मजल्यावर दुकान असून इमारत पडल्यानंतर सदर दुकान तसेच चालू ठेवण्याची त्याची इच्छा आहे. तदनंतर हया इमारतीचा पुनर्विकास इमारतमालक त्याच्या सोयीनुसार व मर्जीनुसार करणार आहे. त्यामुळे मंडळाने जर पुनर्रचना योजना कार्यान्वित केली तर सदर इमारत मालक त्याचे दुकान चालू राहण्याच्या दृष्टीने न्यायालयात प्रकरण दाखल करुन मंडळाच्या पुनर्रचना योजनेमध्ये अडथळे आणण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे येथून पुढे इमारतीचा तळमजला तसाच ठेवण्याऐवजी तो पाडण्याबाबत विचार करावा लागणार आहे.

मा.सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, पुनर्रचना योजना राबविताना मूळ निविदेमध्ये मनोरंजनाच्या मैदानासाठी, बागेसाठी, व्यायाम शाळा, अभ्यासिका, सोसायटी कार्यालय हयासाठी तरतूद करुन त्यांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. कारण चाळीतून एखादा रहिवाशी जेव्हा इमारतीत राहावयास जातो तेव्हा त्याचे सामाजिक संबंध संपुष्टात येतात. त्यामुळे अशी तरतूद आपण पुनर्रचित इमारतीत करु शकू का? खाजगी विकासक ज्याप्रमाणे रस्ता रुंदीकरणातील जागा म.न.पा. कडून त्याठिकाणी बाग वगैरे उभारण्याकरिता परत घेतात त्याप्रमाणे आपणही करु शकतो का? हया सर्व बाबींचा विचार करुन एक सविस्तर बाब टिपणी मंडळापुढे सादर करण्याच्या सूचना मा. सभापतींनी दिल्या.

वरील सविस्तर चर्चेअंती विषयांकित पुनर्बांधणी कामाची मे.सी.बी.एन्ड सन्स हया ठेकेदाराची ११ टक्के कमी दराची निविदा स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक : ७७/५८९

इ.क्र.४०६-४१२, पारसीवाडा, ना.म.जोशी मार्ग, लोअरपरेल विभाग, मुंबई हया पुनर्बांधणी योजनेची मे.सी.बी.एन्ड सन्स हया ठेकेदाराची **११ टक्के कमी दराची** निविदा स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक: ७७.५

विषय- **मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय.**

अ) इ.क्र.८६-१०, ९४ए व ९४बी, टी.बी.कदम मार्ग व इ.क्र.४९-४९ए,

५१-५३, के.के.मार्ग हया इमारतींच्या पुनर्बांधणी कामांच्या निविदांबाबत.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी आयत्यावेळच्या विषयामध्ये उपरोक्त निविदेंबाबत असे प्रतिपादन केले की, प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनंतर त्यांनी उपरोक्त दोन्ही पुनर्बांधणी कामांच्या निविदा पुन्हा मागविल्या होत्या. हया दोन्ही कामांच्या निविदा दि.२.५.२००२ रोजी उघडण्यात आल्या आहेत. हया दोन्ही निविदांचे दर निविदा रक्कमेपेक्षा अधिक आहेत.

हयाबाबत मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, लवकरच पावसाळा सुरु होणार आहे तसेच रहिवाशी संक्रमण शिबीरात राहात आहेत. त्यामुळे हया निविदेबाबत विलंब करुन चालणार नाही.

हयाबाबत मा.सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. सभापती, मुख्य अधिकारी व तांत्रिक समितीच्या सदस्यांनी एकत्र बसून हया दोन्ही कामांच्या निविदांबाबत निर्णय घ्यावा. आपण तांत्रिक समिती हयापूर्वीच गठित केली असल्याने हया निविदांबाबत दोन दिवसांत निर्णय घेण्यास हरकत नाही.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रस्तावित केले की, हया दोन्ही निविदांची माहिती तयार करुन ती सोमवारी म्हणजे दि. ०६/०५/२००२ रोजी किंवा तदनंतर मा. सभापती, ते स्वतः व सन्मा. सदस्य यांचेबरोबर चर्चा करुन निर्णय घेतील.

वरील सविस्तर चर्चेअंती हया दोन्ही निविदांबाबत मा. सभापती, मुख्य अधिकारी व सदस्य हयांनी दि. ६.५.२००२ रोजी किंवा तदनंतर एकत्र चर्चा करुन त्यावर निर्णय घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक : ७७/५९०

इ.क्र.८६-९०, ९४ए व ९४बी, टी.बी.कदम मार्ग व इ.क्र.४९-४९ए, ५१-५३, के.के.मार्ग हया दोन पुनर्बांधणी योजनांच्या कामांच्या निविदाबाबत मा. सभापती, मुख्य अधिकारी व सन्मा. सदस्य हयांनी शक्य झाल्यास दि. ६.५.२००२ रोजी किंवा तदनंतर एकत्र चर्चा करुन त्यावर योग्य तो निर्णय घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

(२) विषय- अ) इ.क्र.२७३-२७९, भंडारी चाळ व २८३ वंजारी चाळ, साने गुरुजी मार्ग, सात रस्ता, ई विभाग येथील पुनर्रचना योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

ब) इ.क्र.२८३, वंजारी चाळ, साने गुरुजी मार्ग, सात रस्ता, इ विभाग, भूकर पहाणी क्र.२००७, उपकर क्र.इ ७३०३ (२), मुंबई या इमारतीस म्हाडा अधिनियम ८८ (३) (ब) अन्वये प्रमाणपत्र देण्याबाबत.

उपरोक्त दोन्ही प्रस्ताव उपमुख्य अभियंता (पुनर्र.) श्री.वणीकर यांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्माननीय सदस्यांना सादर केले.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी प्रस्तावांच्या अनुषंगाने त्यांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र.२७३-२७९, भंडारी चाळ ही तळमजल्यापर्यंत पाडली असून हया इमारतीच्या भूखंडाचा काही भाग रस्तारुंदीकरणात जात आहे. इ.क्र. २८३, वंजारी चाळ हया इमारतीचा भूखंड अरुद असून हया इमारतीच्या बाजूला आपण अगोदरच शांती भूवन नावाची इमारत पुनर्रचित केली असल्याने तिची स्वतंत्र पुनर्बांधणी करता येणे शक्य नाही. त्यामुळे इ.क्र. २८३, वंजारी चाळ ही प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(ब) अन्वये घोषित करण्याचा आणि इ.क्र.२७३-२७९, भंडारी चाळ व इ.क्र. २८३, वंजारी चाळ अशी संयुक्त पुनर्बांधणी योजना राबविण्याचे प्रस्तावित असून त्यानुसार हा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेसाठी रु. ४२६४९१७७/- एवढा खर्च अपेक्षित असून त्यास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला जाईल.

सविस्तर चर्चेअंती इ.क्र. २८३, वंजारी चाळ ही प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(ब) अन्वये घोषित करुन इ.क्र.२७३-२७९, भंडारी चाळ व इ.क्र. २८३, वंजारी चाळ हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७७/५९१

१) इ.क्र.२८३, वंजारी चाळ, साने गुरुजी मार्ग, सात रस्ता, ई. विभाग, मुंबई ही इमारत प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(ब) अन्वये घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

२) इ.क्र.२७३-२७९, भंडारी चाळ व इ.क्र. २८३, वंजारी चाळ सात रस्ता, ई. विभाग, मुंबई हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु.४२६४९१७७/- (रु. ७९००/- प्रति चौ.मी. दराने) हया रक्कमेस प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

....

विषय-इ.क्र. २६४ ए, २ सुरेश विठठल निवास, लखमसी नपू रोड, माटुंगा, (मध्य) मुंबई हया इमारतीच्या रहिवाश्यांनी प्राधिकरण अधिनियम १९७६च्या कलम १०३ (बी) नुसार सादर केलेला प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव कार्यकारी अभियंता (सह.गृह.संस्था कक्ष) हयांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी सर्व सन्मा.सदस्यांना सादर केले.

कार्यकारी अभियंता, सहकारी कक्ष हयांनी प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, नियमानुसार हया प्रस्तावास ७० टक्केपेक्षा अधिक रहिवाश्यांनी संमती दिलेली असून हा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यास हरकत नसावी असे वाटते.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक ७७ / ५९२

इ.क्र. २६४-ए २, सुरेश विठठल निवास लखमशी नापू रोड माटुंगा (मध्य) मुंबई येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित सुरेश विठ्ठल निवास सह.गृह. संस्थेकरीता प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (बी) अन्वये भू-संपादन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

तदनंतर मा. सदस्य, श्री. गजेंद्र लष्करी हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (बी) नुसार प्राप्त झालेले ३१ प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामुळे भू-संपादन अधिकारी / प्रा.हयांचेकडे प्रलंबित आहेत. हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायाधिशांच्या खंडपीठापुढे चर्चिले जाणार असल्याने त्यास बराच कालावधि लागण्याची शक्यता आहे. हे ३१ प्रस्ताव विशेष भू संपादन अधिकारी हयांनी प्रलंबित ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निकालानुसार हया ३१ प्रस्तावात काय कार्यवाही करावी हयाबाबत आपण विधी सल्लागार / प्रा. हयांच्याकडे हे प्रकरण दोन दिवसापूर्वीच पाठविले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येण्यास किती कालावधि लागेल हयाबाबत भाष्य करता येणे शक्य नाही.

मा.सदस्य श्री.विश्वास मोकाशी हयांनी तद्नंतर आयत्यावेळच्या विषयामध्ये असा मुद्दा उपस्थित केला की, मागे आपण पुनर्बांधणी कामाच्या गुणवत्तेच्यादृष्टीने निवडक ठेकेदारांची यादी तयार करण्याबाबत त्यावेळेचे उपमुख्य अभियंता (पुनर्र.) श्री.देसाई साहेब हयांच्याबरोबर बैठकीमध्ये चर्चा केली होती. हया निवडक ठेकेदारांची यादी करण्याबाबत पुढे काहीच कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे मा.सदस्य श्री.विश्वास मोकाशी हयांनी अशी सूचना केली की, ही निवडक ठेकेदारांची यादी तयार करुन ती मंडळाच्या पुढील वा त्यापुढील बैठकीत सादर करावी. जेणेकरुन कामाच्या दर्जाबाबतचा प्रश्न निकाली लागेल.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, निवडक ठेकेदारांची यादी तयार करण्याबाबतचे प्रकरण तपासून ते पुढील बैठकीत सादर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

विषयः- **मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.**

मुंबई बेटावरील **"अ"** वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील ८ प्रस्ताव आयत्या वेळच्या विषयामध्ये मा. अध्यक्षांच्या परवानगीने मंजुरीसाठी सादर करण्यांत आले.

१. भुकर पहाणी क्र. ५७/७४, परेल शिवडी विभाग, भूखंड क्र.४७, लालबाग इस्टेट,उपकर क्र.एफ,एस ५९७ (१ ए) **भागीरथी भवन** नावाने ओळखली जाणारी इ.क्र.२०७ए, जीजीभाई लेन (४७ गणेशगल्ली), लालबाग मुंबई या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पहाणी क्र. २९३, ताडदेव विभाग, उपकर क्र.डी-३६९८ (३ए) **अब्दुल्ला हाऊस** नावाने ओळखली जाणारी इ. क्र. ३५ ए, तुकाराम जावजी रोड, ताडदेव मुंबई या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

३. भुकर पहाणी क्र. १९०० भायखळा विभाग, उपकर क्र.इ-४४५३(३) व ४४५४ (१) **अल्लाना मॅन्शन** नावाने ओळखली जाणारी इ. क्र.१६-२०ए, डॉ. ए.आर.नायर रोड, मुंबई ४०० ०११ या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

४. अंतिम भूखंड क्र.८५७-ए, नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, उपकर क्र.जी ३१६८ व जी ३१६९ (२) इ.क्र.आयए,आर.बी.एस.के.बोले रोड व १८, गोखले रोड (द.) व जुना प्रभादेवी रोड या मधील रस्ता, दादर (प.),मुंबई या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

५. भुकर पहाणी क्र.६३७, माझगाव विभाग, उपकर क्र.इ-७७२२(१ए), व ७७२२ (१ डी), इ.क्र.४०-४४ए, टँक बंदर रोड, माझगाव, मुंबई येथील **रौफ मंझील** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

६. भुकर पहाणी क्र.१४१५, भायखळा विभाग, उपकर क्र.इ-७०४, **बद्रुनीसा बिल्डींग** या नावाने ओळखली जाणारी इ.क्र.१५७-१५९,डिमिमटकर रोड, भायखळा, मुंबई ४०० ००८ या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

७. भुकर पहाणी क्र.१७८५, भायखळा विभाग, उपकर क्र.इ-३९१४(६), **हबीब मॅन्शन** नावाने ओळखली जाणारी, इ.क्र.७, सांकळी स्ट्रीट, छेद गल्ली क्र.२, भायखळा या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

८. भुकर पहाणी क्र.३२७१, भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-३६६४, **कुरेशी मंझील** या नावाने ओळखली जाणारी इ.क्र.११८-१२२, मस्जिद स्ट्रीट, मुंबई ४०० ००३ या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

वरील सर्व प्रस्तावांच्या अनुषंगाने मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये नियमाप्रमाणे ७० टक्के भाडेकरू / रहिवाश्यांची संमत्ती असून मालमत्ताधारक/

मुखत्यारपत्रधारक / विकासक हयांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी रहिवाश्यांची यादी , त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ, जुन्या इमारतींचे नकाशे तसेच अपरिवर्तनीय संमत्तीपत्रे तपासून प्रमाणित केलेली आहेत. त्यामुळे सदर प्रस्ताव, प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास हरकत नसावी.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील **"अ"** वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी अ.क्र.१ते८ वर सादर केलेल्या प्रस्तावांना प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक: ७७/५९३

मुंबई बेटावरील **"अ"** वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मालमत्ताधारक/मुखत्यारपत्रधारक/विकासक हयांच्याकडून प्राप्त झालेल्या खालील ८ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र. ५७/७४, परेल शिवडी विभाग, भूखंड क्र.४७, लालबाग इस्टेट,उपकर क्र.एफ,एस ५९७ (१ ए) भागीरथी भवन नावाने ओळखली जाणारी इ.क्र.२०७ए, जीजीभाई लेन (४७ गणेशगल्ली), लालबाग मुंबई.

२. भुकर पहाणी क्र. २९३, ताडदेव विभाग, उपकर क्र.डी-३६९८ (३ए) अब्दुल्ला हाऊस नावाने ओळखली जाणारी इ. क्र. ३५ ए, तुकाराम जावजी रोड, ताडदेव मुंबई.

३. भुकर पहाणी क्र. १९०० भायखाळा विभाग, उपकर क्र.इ-४४५३(३) व ४४५४ (१) अल्लाना मॅन्शन नावाने ओळखली जाणारी इ. क्र.१६-२०ए, डॉ. ए.आर.नायर रोड, मुंबई.

४. अंतिम भूखंड क्र.८५७-ए, नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, उपकर क्र.जी ३१६८ व जी ३१६९ (२) इ.क्र.आयए,आर.बी.एस.के.बोले रोड व १८, गोखले रोड (द.) व जुना प्रभादेवी रोड या मधील रस्ता, दादर (प.),मुंबई.

५. भुकर पहाणी क्र.६३७, माझगाव विभाग, उपकर क्र.इ-७७२२(१ए), व ७७२२ (१ डी), इ.क्र.४०-४४ए, टॅंक बंदर रोड, माझगाव, मुंबई.

६. भुकर पहाणी क्र.१४१५, भायखाळा विभाग, उपकर क्र.इ-७०४,बद्रुनीसा बिल्डींग या नावाने ओळखली जाणारी इ.क्र.१५७-१५९,डिमिमटकर रोड, भायखाळा, मुंबई.

७. भुकर पहाणी क्र.१७८५, भायखाळा विभाग, उपकर क्र.इ-३९१४(६), हबीब मॅन्शन नावाने ओळखली जाणारी, इ.क्र.७, सांकळी स्ट्रीट, छेद गल्ली क्र.२, भायखळा.

८. भुकर पहाणी क्र.३२७१, भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-३६६४, कुरेशी मंझील या नावाने ओळखली जाणारी इ.क्र.११८-१२२, मस्जिद स्ट्रीट, मुंबई.

तद्नंतर मा.सदस्य श्री.सचिन सावंत हयांनी असे निदर्शनास आणून दिले की, भागीनथी भुवन (इ.क्र.२४ एबी, काकासाहेब गाडगीळ मार्ग) बाबत रहिवाशांनी नुकतेच त्यांना एक निवेदन दिले आहे.

त्याबाबत आपण काय कार्यवाही करणार आहोत. हयाचबाबत मा.सदस्य, श्री.गजेंद्र लष्क अशी विचारणा केली की, भागीरथी भवन बाबत दि.२.५.२००२ रोजी जी चर्चा झाली त्य कोणता निर्णय घेण्यात आला.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीबाबत दि.२.५ रोजी मा.सभापती हयांनी हया इमारतीतील सर्व रहिवाशी, व इमारत मालक हयांच्याबरोबर घेतली होती. हया इमारतीतील रहिवाशांचे दोन गट असून एका रहिवाशांच्या गटाने हे न्यायालयात दाखल केलेले आहे. हया न्यायालयीन प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दि.२२.३ रोजी असे आदेश दिले आहेत की, रहिवाशांचे म्हणणे मुख्य अधिकारी हयांनी ऐकून घेऊन प्रकरणात आदेशांपासून ८ आठवडयात निर्णय घेऊन तो मा.उच्च न्यायालयास कळवावा. त्याप्र आपणांस दि.२५ मे २००२ पर्यंत किंवा तत्पूर्वी निर्णय घ्यावयाचा आहे. हयानुसार दि.२.५.२००२ रो मा.सभापती हयांनी सर्व रहिवाशी व इमारत मालकांबरोबर बैठक घेतली. रहिवाशांना हया विषयाच पूर्ण कल्पना आहेच, हयापूर्वीही त्यांच्याबरोबर बैठका झाल्या असून सदर बैठकांना काही सन्मा.सदस्यही उपस्थित होते. काल हया सर्व रहिवाशांना बरेच समजावण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतू हया रहिवाशांमध्ये एकमत होण्याची चिन्हे अजिबात दिसून येत नाहीत. हया रहिवाशांचे आपापसातील मतभेद विकोपाला गेलेले आहेत. मंडळाने कार्यान्वित केलेल्या पुनर्रचना योजनेबाबत चालू असलेल्या प्रक्रियेची त्यांना माहिती देण्यात आली. ही उपकरप्राप्त इमारत असल्याने तिची पुनर्रचना करणे ही मंडळाची जबाबदारीच आहे. हया सर्व परिस्थितीची माहिती रहिवाशांना आपण दिली असून त्यांचे लेखी म्हणणे घेऊन त्यांना आपण दि.१४.५.२००२ रोजी पुन्हा चर्चेस बोलाविले आहे. हयाबाबत ७० टक्के रहिवाशांचे एकमत झाले तर त्यांना आपण पुनर्विकास करण्यास परवानगी देऊ; अन्यथा हया इमारतीची पुनर्रचना मंडळामार्फतच केली जाईल असा निर्णय घेऊन तो मा.उच्च न्यायालयास कळविला जाईल.

हयाबाबत मा.सदस्य श्री.रघुनाथ थवई हयांनी असे प्रतिपादन केले की, आपण दि.१४.५.०२ पर्यंत हया रहिवाशांना वेळ दिला असल्याने तोपर्यंत वाट पाहू.

हयाबाबत मा.सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, कालच्या बैठकीत असे दिसून आले की, इमारत मालक जी पुनर्विकासाची कार्यवाही करीत आहे त्यावर रहिवाशांचा अजिबात विश्वास नाही. रहिवाशांना आपण असे सांगितले की, जर इमारत मालकावर विश्वास नसेल तर त्यांनी त्यांच्या वकिलामार्फत न्यायालयात कन्सेंट टर्म दाखल करावीत. जेणे करुन इमारत मालक फसविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. इमारत मालकास जर पुनर्विकास करावयाचा असेल तर तोदेखील हया कन्सेंट टर्म सही करील. न्यायालयाने हया कन्सेंट टर्म स्विकारल्यानंतर इमारत मालकास पुनर्विकास करावाच लागेल. हया मुद्दयावर विचार करण्याचे रहिवाशांनी मान्य केले आहे. त्यानुसार ते त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात देऊन दि.१४.५.०२ रोजी होणा-या बैठकीत त्यावर विचार करण्यात येईल.

मा.सदस्य, श्री.सचिन सावंत हयांनी तद्‌नंतर असा मुद्दा उपस्थित केला की, पिंपळवाडी हया प्रकरणाबाबत नेमकी काय वस्तुस्थिती आहे हयाची सदस्यांना काहीच कल्पना नाही. हया प्रकरणाबाबत वृत्तपत्रांतून मा.सभापती महोदय हयांच्यावर ताशेरे ओढण्यात आले आहेत. हयाबाबत आपल्या विधी विभागामार्फत उच्च न्यायालयात दावा कशाप्रकारे हाताळण्यात आला व हा दावा आपण परिणामकारकरित्या हाताळला गेला किंवा नाही, हया व अशा इतर मुद्दयांबाबतची माहिती देण्याबाबत तसेच हया प्रकरणाबाबत एक विधी चर्चासत्र आयोजण्याची विनंती मा.सदस्य श्री.सचिन सावंत हयांनी केली.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणाबाबत आपण चर्चासत्र आयोजित करण्यास हरकत नाही. हयाबाबत दि.२.५.०२ रोजी मा.सभापती महोदयांशी चर्चा झालेली आहेच. आपल्या दुरुस्ती मंडळाचा स्वतंत्र असा विधी विभाग नाही. परंतू प्राधिकरणाचा विधी विभाग आहे. हयाबाबत मा.सभापती महोदय हयांच्या दालनात आपण बैठक घेऊन त्यामध्ये मंडळाचे ४-५ सदस्य व विधी विभागातील अधिकारी श्री.वाचासुंदर हयांना चर्चेसाठी निमंत्रीत करु. महत्वांच्या प्रकरणात जसे आपण खाजगी वकील नेमतो तसे खाजगी वकील हयाही प्रकरणात नेमले होते. हया प्रकरणाचा निकाल दोनच दिवसापूर्वी लागला असून, आपणांस अद्याप निर्णयाची प्रत मिळालेली नाही.

हयाबाबत मा.सदस्य, श्री.बाप्पा सावंत हयांनी असे मत प्रदर्शित केले की, आपण जे वकील नेमले होते त्यांनी न्यायालयात आपली बाजू ठामपणे व योग्यरित्या मांडलेली नाही. ज्या विषयासाठी हे प्रकरण न्यायालयात दाखल केले गेले त्या विषयाला सोडून मंडळाच्या सभापतींवर खाजगी स्वरुपाचे ताशेरे ओढणे हे चुकीचे आहे. त्यामुळे आपण नेमलेल्या वकीलांनी आपली बाजू योग्यरित्या तर न्यायालयात मांडली नाहीच परंतू त्यांनी अशा खाजगी स्वरुपांचे ताशेरे न ओढण्याबाबत मा.न्यायालयास विनंती करणे आवश्यक होते.

तद्‌नंतर मा.सदस्य श्री.सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, न्यायालयाचा निर्णय दोन दिवसापूर्वीच लागूनही आपल्या मंडळाकडे न्यायालयीन निर्णयाची प्रत प्राप्त न होणे ही बाब विचार करण्यासारखी आहे. न्यायालयीन निर्णयाची प्रत इतर दावेदारांना तसेच वृत्तपत्रांना प्राप्त होते, परंतू सदर प्रत आपल्या मंडळास प्राप्त होत नाही. याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले.

हयाबाबत मा.सदस्य श्री.बाप्पा सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, हे मंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी युती शासनाच्या काळातही हयाच धर्तीवर ८-१० भूसंपादित मालमत्तांना पुनर्विकासाची नाहरकत प्रमाणपत्रे प्रदान केलेली आहेत. शासनाच्याच मार्गदर्शक सूचनांनुसार हया ८-१० प्रस्तावांप्रमाणे व पिंपळवाडी पुनर्विकास योजनेस ना हरकत प्रमाणपत्रे प्रदान केलेली आहेत. त्यामुळे ही वस्तुस्थिती न्यायालयाच्या निदर्शनास आणणे आवश्यक होते.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, पिंपळवाडी प्रकरणाचा न्यायालयीन निकाल दि.३०.४.०२ रोजी लागला असून, हयाबाबत दि.२.५.०२ रोजी मा.सभापती महोदयांबरोबर चर्चा करण्यात आली आहे. हया प्रकरणाची सविस्तर चर्चा करण्यासाठी आपण मंडळाच्या चार-पाच सदस्यांबरोबर व विधी सल्लागार/प्रा.यांच्याबरोबर लवकरच बैठक घेऊ. आता आपणांस न्यायालयीन निर्णयाविरुध्द कायदेशीर कार्यवाही कशी करता येईल, हयाबाबत विचार करावा लागणार आहे.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी हयांनी तद्नंतर जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पावसाळापूर्व पहाणीचा मुद्दा उपस्थित करुन अशी विचारणा केली की, हे पावसाळापूर्व सर्वेक्षण केव्हा संपणार आहे.

यावर उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील ९० टक्के इमारतींचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, उर्वरित सर्वेक्षण १५ मे पर्यंत पूर्ण होईल. तद्नंतर रेल्वे लगतच्या इमारतींची पाहणी रेल्वे अधिका-यांबरोबर तसेच इतर इमारतींची पाहणी महानगरपालिकेच्या अधिका-यांबरोबर संयुक्तरित्या केली जाईल. तद्नंतर धोकादायक इमारतींची यादी निश्चित करुन ती विविध भाषिक वर्तमानपत्रात प्रसिध्द केली जाईल.

मा.सभापती हयांनी हयाबाबत अशी सूचना केली की, त्यांना व सन्मा.सदस्यांना ५-६ इमारती सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर दि.१६ किंवा १७ मेला दाखवून नंतरच या सर्वेक्षणात आढळलेल्या धोकादायक इमारतींची यादी प्रसिध्दी माध्यमांद्वारे प्रसिध्द करावी.

मा.सदस्य श्री.सचिन सावंत हयांनी तद्नंतर असा मुद्दा उपस्थित केला की, ८-१० दिवसांपूर्वी जेव्हा मा.सभापती महोदयांच्या कार्यालयात ते आले हाते, तेव्हा त्याठिकाणी संक्रमण शिबीरातील काही रहिवाशी व ज्यांना संक्रमण शिबीरात जागा हवी आहे असे रहिवाशी त्या ठिकाणी भेटले होते. हया रहिवाशांनी अशा तक्रारी केल्या आहेत की, ते जव्हा मंडळाच्या अधिका-यांना भेटायला येतात, तेव्हा त्यांना ब-याच कालावधीपर्यंत ताटकळत उभे रहावे लागते, मंडळाचे अधिकारी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ करतात, संक्रमण शिबीरातील गाळे वाटपाची पध्दती आक्षेपार्ह आहे. वास्तविक हया मंडळाची स्थापना अशा प्रकारच्या गरीब रहिवाशांना मदत करण्यासाठी झालेली असताना त्यांना अशाप्रकारची वागणूक देणे ही चांगली बाब नाही. हयामुळे मा.सदस्य श्री.सचिन सावंत हयांनी अशी विनंती केली की, संक्रमण शिबीरातील कार्यपध्दतीबाबत चर्चा करण्यासाठी मंडळाच्य पुढील बैठकीमध्ये सविस्तर माहिती सादर करावी.

हयाबाबत मा.सदस्य श्री.विश्वास मोकाशी हयांनी असे प्रतिपादन केले की, संक्रमण शिबीराबाबत सविस्तर चर्चा करण्याचे मंडळाच्या मागील बैठकीत ठरले होते. परंतू त्या काळामध्ये संबंधित अधिकारी हे निवडणूकीच्या कामात व्यस्त होते, त्यामुळे हया विषयावर त्यावेळी चर्चा होऊ शकली नाही. परंतू आता मंडळाच्या पुढील बैठकीत या विषयावर आपण चर्चा करु.

मा.सदस्य, श्री.रमेश परब हयांनी तद्नंतर असा मुद्दा उपस्थित केला की, तपोवन इमारतीतील अरुण क्रिडा मंडळाने बालवाडी, व्यायामशाळा व अभ्यासिका बांधण्याकरिता मंडळाकडे रितसर अर्ज करुन परवानगी मागीतली आहे. परंतू आपण त्यांना कळविले आहे की, अशी परवानगी देता येणार नाही. परंतू अशाच प्रकारची परवानगी आपण सनमिल लेन येथील उर्जाप्रसाद हया हॉटेल मालकाला अनिवासी गाळा बांधण्यास दिलेली आहे. अरुण क्रिडा मंडळ ही एक सामाजिक कार्य करणारी संस्था असताना आपण त्यांना परवानगी नाकारणे योग्य वाटत नाही.

हयाबाबत मा.सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, नियोजित बांधकामाचे नकाशे वास्तुशास्त्रज्ञांनी प्रमाणित करुन मंडळाकडे सादर केलेले आहेत. त्यामुळे त्यास महानगरपालिकेची मान्यता घ्यावी लागेल असे आपले म्हणणे आहे.

हयाबाबत मा.सदस्य, श्री.विश्वास मोकाशी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया बांधकामास परवानगी देताना त्यांना अशी अट घालण्यात यावी की, हयासाठी आवश्यक कायदेशीर बाबींची पूर्तता करावी लागेल. ज्यामुळे महानगरपालिकेची मंजूरी प्राप्त करणे वा इतर जबाबदारी सदर क्रिडा-मंडळावरच सोपवावी. आपण तत्वतः हया बांधकामास परवानगी द्यावी. त्यानुसार प्रस्ताव मंडळापुढे सादर करुन त्यास मान्यता द्यावी.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, महानगरपालिकेची बांधकामास परवानगी घेऊन त्याची प्रत मंडळाकडे सादर करुन काम करण्यास मंडळाची परवानगी द्यावी, त्यानुसार परवानगी देयाबाबतचे आदेश का.अ.(पु.वि.३) हयांना मुख्य अधिकारी हयांनी दिले. महानगरपालिकेने जर त्यांना मंजूरी नाकारली तर मग त्याठिकाणी अरुण क्रिडा मंडळास बांधकाम करण्याचा प्रश्नच रहाणार नाही.

मा.सदस्य, श्री.बाप्पा सावंत हयांनी तद्नंतर असा मुद्दा उपस्थित केला की, गांधीनगर सह.गृह. संस्था हया संस्थेने प्राधिकरणाला रु.९ लाख देणे आवश्यक आहे. हया संस्थेतील रहिवाशांनी ९ लाख रुपये जमा करुन संस्थेला दिलेले आहेत, परंतू हया संस्थेने सदर रक्कम मंडळाला दिलेली नाही. त्यामुळे हया संस्थेतील रहिवाशांनी अशी मागणी केली आहे की, ही संस्था प्राधिकरणाला पैसे देत नसल्याने रहिवाशी अन्य सह.गृह.संस्था स्थापन करु शकतात का? अशी स्वतंत्र सह.गृह.संस्था स्थापन करुन ते प्राधिकरणास देय असलेली रक्कम परस्पर देतील.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी मा.सदस्य श्री.बाप्पा सावंत हयांना त्यांना प्राप्त झालेल्या निवेदनाची प्रत देण्यास सांगितले व हया प्रकरणाचा तपास करुन पुढील कार्यवाही करु असे सांगितले.

मा.सदस्य, श्री.रमेश परब हयांनी तद्नंतर असा मुद्दा उपस्थित केला की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत बांधलेल्या इमारतीतील सदनिकांना मालमत्ता कर व इतर करात सवलती दिल्या जातात. मात्र मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने बांधलेल्या इमारतीतील सदनिकांना करात कोणत्याही प्रकारची सवलत दिली जात नाही. हयाबाबत आपण काही कार्यवाही करु शकतो का? अशी विचारणा मा.सदस्य श्री.रमेश परब हयांनी केली.

हयाबाबत मा.सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया विषयावर मागील अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्यात आलेला होता. परंतू त्याकडे अद्याप कोणीही गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. हा प्रश्नच मुळात धोरणात्मक असल्याने त्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरच करावी लागणार आहे. हयाबाबत आपण स्वतः व मुंबई शहरातील आमदारांनी एकत्र येऊन चर्चा करुन त्याबाबत कार्यवाही करावी लागणार आहे. करांमध्ये सवलत देणे म्हणजे महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात घट होणे

अनिवार्य आहे. त्यामुळे हया प्रश्नास महानगरपालिकेतर्फे विरोध केला जाणार हे निश्चितच आहे. त्यामुळे हया प्रकरणात शासनालाच मध्यस्थी करुन निर्णय घ्यावा लागणार आहे.

हयाबाबतीत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधलेल्या इमारतींना करांमध्ये पूर्णतः सवलत दिलेली नाही. पहिल्या ५ वर्षासाठी एकूण कराच्या २० टक्के रक्कम, पुढील ५ वर्षासाठी एकूण कराच्या ५० टक्के रक्कम अशा प्रकारे १५ वर्षापर्यंत १०० टक्के कराच्या रकमेचा भरणा करावयाचा आहे. आपण ज्या इमारती पुनर्रचित केल्या आहेत व अशा पुनर्रचित इमारतीमध्ये जे जुन्या इमारतीतील मूळ रहिवाशी रहात आहेत त्यांना करांमध्ये अशा प्रकारची सवलत देण्याचा प्रस्ताव आपण शासनाकडे पूर्वीच सादर केला आहे. परंतू हा धोरणात्मक प्रश्न असल्याने मा.सभापती महोदयांनी सुचविल्यानुसार हा प्रश्न अधिवेशनाच्या मार्गाने वा आमदारांच्या पुढाकाराने मार्गी लावावा लागेल. पुनर्विकास योजनेमध्ये ज्या काही अडचणी आहेत त्या अडचणीमध्येही हा महत्वाचा मुद्दा आहे. कारण इमारत पुनर्रचित झाल्यानंतर मालमत्ता करापोटी रहिवाशांना प्रति चौ.फूट २ ते २.५० रुपये दराने कर भरावा लागतो जो हया रहिवाशांना आर्थिकदृष्टया परवडणारा नाही. हयामुळे बरेचसे रहिवाशी इमारतीच्या पुनर्रचनेस विरोध करतात. ज्यामुळे पुनर्बांधणीच्या कामांना गती देता येत नाही.

मा.सदस्य श्री.बाप्पा सावंत हयांनी तद्नंतर असा मुद्दा उपस्थित केला की, गांवदेवी, जे.के. बिल्डींगबाबत वर्तमानपत्रामध्ये म्हाडाची घोर फसवणूक हया मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली होती. हया प्रकरणाची नेमकी वस्तुस्थिती काय आहे?

हयाबाबत मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील काही गाळे पूर्वी पोलिस कर्मचा-यांना दिले होते जे मा.न्यायालयाच्या आदेशानूसार घरमालकास परत करण्यात आले व इमारत मालकाने नंतर इतर रहिवाशांना दिले आहेत, अशी तक्रार काही रहिवाशांनी केली आहे. हयाबाबत सविस्तर अहवाल आपण नुकताच शासनास सादर केलेला आहे. वर्तमानपत्रामध्ये आजकाल म्हाडाबद्दल बरीच माहिती प्रसिध्द होत असते. हया बातम्यांमध्ये बरीचशी माहिती १०० टक्के खरी असतेच असे नाही. त्यांनी पुढे असे सांगितले की, भागीरथी भुवन हया इमारतीबाबत वर्तमानपत्रात जी बातमी प्रसिध्द झाली होती त्यानुसार मुख्य अधिकारी व मा.सभापती महोदयांनी हयांनी इमारतीतील रहिवाशांना चुकीचा सल्ला दिला. वास्तविकतः आत्तापर्यंत हया इमारतीबाबत रहिवाशांबरोबर ज्या बैठका झाल्या, त्यामध्ये आपण रहिवाशांना चुकीचा सल्ला दिलेला नाही. याउलट जी वस्तुस्थिती आहे त्याची माहिती आपण रहिवाशांना दिलेली आहे. आपण चुकीचा सल्ला देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आपण त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे विचार करण्यास सवलत दिली आहे.

हयाबाबत मा.सदस्य श्री.विश्वास मोकाशी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया मंडळाला जेव्हा एक वर्ष पूर्ण झाले तेव्हा मंडळाने एका वर्षात जी कामे केली त्याची माहिती सर्वसामान्य

जनतेसमोर ठेवण्याबाबत त्यांनी सूचना केली होती. त्यादृष्टीने कार्यवाही करावी. जेणेकरुन मंडळाने केलेल्या कामाची माहिती सर्वसामान्य जनतेला मिळेल.

मा.सदस्य श्री.रमेश परब हयांनी ते ज्या मानाजी राजूजी बिल्डींगमध्ये रहात होते,त्या इमारतीतील सर्व रहिवाशी संक्रमण शिबीरात रहावयास गेले आहेत व इमारत पाडण्याचे काम चालू आहे. हया १५ तारखेला अक्षय तृतीया असून या शुभमुहूर्तावर त्या ठिकाणी पुनर्बांधणी योजनेच्या भूमिपुजनाचा कार्यक्रम आहे. तेव्हा हया कार्यक्रमास सर्व सन्मा.सदस्य व अधिका-यांनी उपस्थित रहाण्याचे निमंत्रण दिले.

मा.सभापती हयांनी तद्नंतर मा.सदस्य श्री.विश्वास मोकाशींना आजारपणातून बरे झाले, त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच मा.सभापती हयांनी त्यांना कन्या रत्नाचा लाभ झाला असून, तिचा नामकरण विधी समारंभ दि.५.५.०२ रोजी असल्याचे सांगितले व त्या नाकरण विधी समारंभास, सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी वर्गाने येण्याचे आमंत्रण दिले.

तद्नंतर मा.सभापती हयांनी निधीच्या उपलब्धतेबाबत असे प्रतिपादन केले की, निधी उपलब्ध करुन देण्यबाबत आपण प्राधिकरण स्तरावर अनेक बैठका घेतल्या आहेत. मा.प्रधान सचिव हे ही एका बैठकीस उपस्थित होते. मा.प्रधान सचिव हयांनी हया बैठकीत असे सूचविले आहे की, ज्या ज्या वेळी दुरुस्ती मंडळाकडे निधीची कमतरता असेल त्या त्या वेळी प्राधिकरणाने मंडळास निधी उपलब्ध करुन द्यावा. व त्यानुसार मा.प्रधान सचिवांना तशा आशयाचे पत्र प्राधिकरणास पाठविले आहे. प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत आपण हा मुद्दा पुन्हा उपस्थित करुन मंडळास निधी देण्याबाबत आग्रह करु.

हयाबाबत का.अ.(पु.वि.१) हयांनी असे निदर्शनास आणून दिले की, पुनर्रचना विभागामध्ये काम करणा-या ठेकेदारांची देयके ब-याच दिवसांपासून प्रलंबित असल्यामुळे त्यांची सध्या चालू असलेली कामे निधीअभावी बदं पडण्याची पाळी आली आहे. ठेकेदारांची प्रलंबित देयके त्यांना जर आता आपण अदा केली नाही तर, त्याचा वितरीत परिणाम होणार असून, चालू कामे विहित मुदतीत पूर्ण होणार नाहीत व तद्नंतर हया ठेकेदारांना एस्केलेशन देयकानुसार वाढीव रक्कमही मंडळास अदा करावी लागेल.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत आपणांस ५० टक्के यश मिळालेलेच आहे. प्राधिकरणाच्या मागील बैठकीत आपण मुद्देसूद प्रस्ताव सादर केलेला होता व शासनाने प्राधिकरणाला मंडळास निधी देण्याबाबतचे आदेशही दिले आहेत. परंतू दुरुस्ती विभागातील काही देयकांच्या अडचणींमुळे सध्या निधी प्राधिकरणाने मंडळाला दिलेला नाही. प्राधिकरणातर्फे दुरुस्ती विभागात मागील वर्षी अदा केलेल्या देयकांची तपासणी करण्याबाबत विचार विनिमय चालू आहे.

मा.सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाला दुरुस्ती तसेच पुनर्रचना विभागासाठी एकूण २५ कोटी रुपयांची मागणी प्राधिकरणाकडे केली असून, त्यांनी ती मान्यही केली आहे व ते स्वतः हयाबाबत मा.उपाध्यक्ष/प्रा.हयांचेशी लवकरच चर्चा करणार आहेत.

उपमुख्य अभियंता (पुन.) हयांनी असे निदर्शनास आणून दिले की, पुनर्रचनेची १-२ कामे न्यायालयीन आदेशांनुसार विहित मुदतीत पूर्ण करावयाची असल्याने हया कामांची देयके तरी लवकरात लवकर अदा करणे आवश्यक आहे.

बैठकीच्या अखेरीस मा.सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, मंडळाचे अधिकारी व कर्मचारी वर्ग हयांचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहिर केले. तसेच मंडळाची पुढील बैठक दि.०४ जून २००२ रोजी दु.३.०० वाजता घेण्यात येईल असे जाहिर केले.

सचिव / मुं.इ.दु. व पु.मंडळ

मुख्य अधिकारी/मुं.इ.दु. व पु.मंडळ

मा.सभापती/मुं.इ.दु. व पु.मंडळ

परिशिष्ट " 'अ'

रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या उत्तर परिमंडळातील अंदाजपत्रकाची यादी.

	तळ+ २ ६ + ०= ६	९१९.२४ ९४३.५६	८६७३५४/- ५३४२४०/-	५३४२४०/-	--	मंजूर
I	तळ + १ ७९ + १० = ८९	१४९२.०० ६८९.१२	१०२८१७२/- ६४३०११/-	६४३०११/-	--	-"-
I	तळ +१+२अंशतः ३१ +२० = ५१	१५३५.१९ ५४६.२२	८३८५८५/- ७२५०९३/-	७२५०९३/-	--	-"-
I	तळ + २ ५९ + ३ = ६२	११४५.५७ ५३०.००	६०७२३३/- २७१५१८/-	२७१५१८/-	--	-"-
	तळ + २ ५ + २ = ७	३२५.५९ ९८२.३१	३१९८३१/- १६४२५७/-	१६४२५७/-	--	-"-
I	तळ + २ १० + २ = १२	२२६.०० ८९४.६४	२०२१८९/- २०२१८९/-	२०२१८९/-	--	-"-
था.	तळ + २ २५ +२२ = ४७	१६०६.०० ९३४.४२	१५००६९२/- १४५९४५३/-	१४५९४५३/-	--	-"-
I	तळ + ३ ५५ +१९ = ७४	१६२२.०४ ९६९.३१	१५७२२५७/- ९९३११२/-	९९३११२/-	--	-"-
			६९३६३१३/- ४९९२८७३/-	४९९२८७३/-		

फ.ग.(द) विभाग

१.	फ.ग/द	अ	१५७-अेअे, बहराम मॅन्शन, वरळी रोड, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ९ + ५ = १४	९२५.१३ ९८४.५४	९१०८२९/- ५१०८०१/-	५१०८०१/-	--	मंजूर
२.	-"-	-"-	आरसीवाला बिल्डींग क्र.१, डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ+ १ ७+ २ = ९	२४६.७० ९९५.१४	२४५५०३/- १५८४९५/-	१५८४९५/-	--	-"-
३.	-"-	-"-	४३-५९, अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड, परेल, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + १ १३+ १४ =२७	१२२४.७७ ९५८.८७	११७४४०४/- ४९९७८६/-	४९९७८६/-	--	-"-
४.	-"-	-"-	२०६, यु.पी.निवास, डॉ.एस.एस.राव मार्ग, लालबाग, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + २ ४ + ४ = ८	५०५.८२ ८६८.०९	५०५४७२/- ३३०७८८/-	३३०७८८/-	--	-"-
५.	-"-	-"-	५६४-बी, विठठ्ल निवास, डॉ.ई.मोझेस रोड, सातरस्ता, वरळी, मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ + ५ ७३ +१२ = ८५	२७८५.०३ ९७०.९०	२७०३९८८/- ६१२१६७/-	६१२१६७/-	--	-"-
६.	-"-	-"-	तेजुकाया चाळ नं.३, डॉ.बी.ए.रोड,मुंबई	प.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ० ३० + ४ = ३४	४६१.५६ ७४६.२६	३४४४४४/- ३४४४४४/-	३४४४४४/-	--	-"-
							५८८४६४०/- २४५६४८१/-	२४५६४८१/-		

फ.ग.(उ) विभाग

१.	फ.ग/उ	क	२६८-अेअे, बागे फातिमा (नित्यानंद प्रसाद)बिल्डींग, एम.एम.सी.रोड,माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ३ १६+ ० = १६	८४७.२४ ९९३.४९	७७३९५०/- ७७३९५०/-	७७३९५०/-	--	मंजूर
२.	-"-	ब	२०५-अे, पारेख चेंबर्स, दिलिप गुप्ते मार्ग, दादर, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ४१+७ = ४८	२१४२.४५ ६२७.४६	१३४४३१६/- ७३४०३९/-	७३४०३९/-	--	-"-

५४९

८९

३.	-"-	-"-	१५५, अमिना मंझील, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ४२+ ६=४८	१०८०.५१ ८५५.०६	९२३९००/- ५७२९८३/-	५७२९८३/-	--	मंजूर
४.	-"-		१४४-बी, युनियन हाऊस, मोगल लेन, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ३ १६+ ०= १६	६८६.२३ ७९७.९५	५४७५८३/- ५४७५८३/-	५४७५८३/-	--	-"-
५.	-"-	ब	१४७-१४९, झुबेदा मंझील, वीर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ७ + ६= १३	४८७.५० ८३८.२७	४०८६५८/- २५३५०८/-	२५३५०८/-	--	-"-
६.	-"-	अ व क	१७५, महालक्ष्मी बिल्डींग नं.३, सर भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई	पहिला टप्पा ना.ह.प्र.	तळ+ ३ २०+ ०= २०	१४६९.१६ ७६८.०७	११२८४१८/- ११२८४१८/-	११२८४१८/-	--	-"-
७.	-"-	ब	६४०अे, फिलोमिनो, खारे घाट मार्ग, दादर (पुर्व), मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ २ ६+ ०= ६	७१८.०० ९००.८४	६४६८०५/- ६४६८०५/-	६४६८०५/-	--	-"-
८.	-"-	ब व क	१७८, चंद्रेश्वर भवन, डॉ.बी.ए.रोड, सायन, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ४ ८+ २ = १०	९५१.६५ ६३५.९३	६०५१९१/- ६०५१९१/-	६०५१९१/-	--	-"-
९.	फ.ग/उ	ब व क	६७, कृष्णा प्रसाद, डॉ.एम.बी.राऊत मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई	पहिला टप्पा ना.ह.प्र.	तळ+२+ भाग ३ ११+ ०= ११	६६७.६६ ९२३.९४	६१६८८२/- ६१६८८२/-	६१६८८२/-	--	-"-
१०.	-"-	अ व क	२९-३१, काशिनाथ बिल्डींग, वीर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ+ ३ ५७+१७= ७४	३८८१.०० ९१७.९१	३५६२४३५/- ६९६९१९/-	६९६९१९/-	--	-"-
११.	-"-	अ	१६-बी, दादरकर बिल्डींग, के.व्ही.चितळे पथ, दादर, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ २ २७+ ०= २७	७४९.६५ ९८८.०५	७४०६९३/- ३९२७४०/-	३९२७४०/-	--	-"-
१२.	-"-	अ	१६०-१६४अे, श्रीनाथ बिल्डींग, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा ना.ह.प्र.	तळ+ १ ७+ ०= ७	१८७.१९ ९९२.९४	१८५८६८/- १२७७९२/-	१२७७९२/-	--	-"-
१३.	-"-	अ	५, पुरंदरे निवास, लायब्ररी रोड, दादर (प), मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+२+३अंशतः १५+ ७= २२	७६३.७५ १००३.६९	७६६५७५/- ५६६३३५/-	५६३५१०/-	२८२५/-	-"-
१४.	-"-	अ व क	४०-बी, आत्माराम बिल्डींग, बालमिया क्रॅास लेन, मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळ+ १ १७+ ०= १७	३२३.०३ १३०९.५६	४२३०३०/- ४११३६८/-	३११३६८/-	१०००००/-	-"-

४८

४६०

१५.	-"-	क	प्लॉट नं.१२४, भास्कर भुवन, सायन माटुंगा इस्टेट, सायन (पुर्व),मुंबई	दु.टप्पा सुधा ना.ह.प्र	तळ+ ३ १०+ ०= १०	५८७.२६ ९९७.८१	५८५९७७/- ५००५०८/-	[illegible]००५०८/-	--	मंजूर
१६.	-"-	अ	२८८-अे, केसरी चाळ, सेनापती बापट मार्ग, दादर,मुंबई	प.टप्पा सुधा मंडळ	तळमजला २३+ १५= ३८	७२८.०० ९७१.९२	७०७५६२/- ७०७५६२/-	७०७५६२/-	--	-"-
१७.	-"-	-"-	१५९-१५९ई, चंपा निवास, एल.जे.रोड, माहिम,मुंबई	दु.टप्पा सुधा ना.ह.प्र	तळ+ ३ १५+ ७= २२	७३१.९६ १०००.२७	७२३१५९/- ६०३०१०/-	६०२८११/-	१९९/-	-"-
							१४६९१००२/- ९८८५५९३/-	९७८२५६९/-	१०३०२४/-	

१३०

65

परिशिष्ट - 'ब'

मंडळाच्या दिनांक ३/५/२००२ रोजी झालेल्या ७७ व्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या दक्षिण परिमंडळ अंदाजपत्रकांची यादी.

अ.क्र.	इमारतीचा तपशिल	दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र	मजल्यांची संख्या भाडेकरूंची संख्या	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ दुरूस्तीचा दर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम निविदा रक्कम	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
अ विभाग									
१.	२३-३३ जे. डी. लेन	तिसरा (सु) मंडळ	तळ + ४ १० + २८ = ३८	१४४५.६५ ९८९.७५	१४३०८२६.००	१०००५३१.००	१०००५३१.००	-	मंजूर
२	१९ पहिली पारस्तालेन	तिसरा मंडळ	तळ + ४ १९+ ० = १९	१०२८.५० ९३३.२८	९५९८६८.००	६८२२६५.००	६८२२६५.००	-	मंजूर
३.	२०७-२०९ पी डीमेलो रोड	तिसरा (सु) मंडळ	तळ + १ ४+ १ = ५	७७५.४२ १००८.२५	७८१८२३.००	४४८३०९.००	४४१९०६.००	६४०३.००	मंजूर
४.	१३१ एन. एस. रोड	पहिला (सु) मंडळ	तळ + ६ १८+ ० = १८	४१३७.५५ ८२२.७०	३४०३९३६.००	३४०३९३६.००	३४०३९३६.००	०	३४०३९३६.००
ब विभाग									
५	३४ जेल रोड (उत्तर)	चौथा मंडळ	तळ + १ १० + ४ = १४	२८४.१० १०२१.१४	२९०१०८.००	१४८०५८.००	१४२०५०.००	६००८.००	मंजूर
सी १-२ विभाग									
६	२-४ दुसरी पठाण स्ट्रीट	चौथा मंडळ	तळ + ३ १८ + ७ = २५	६६३.२८ ९९४.५८	६५९६८५.००	३३६२७३.००	३३६२७३.००	--	मंजूर
७	२१ मस्जिद स्ट्रीट	तिसरा (सु) मंडळ	तळ + ४ २४ +८ = ३२	६३१.०० १०२५.४०	६४७०२७.००	३७७०२७०.००	३६१०००.००	१६०२७.००	मंजूर
८	२७-३७ पहिली; अग्यारी लेन	तिसरा मंडळ	तळ + ४ + ५ भाग ५ +१५ = २०	८८७.७३ ६८३.५१	६०६७७२.००	३४०४५३.००	३४०४५३.००	--	मंजूर
९	४२/४४ किका स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ २४ +८ = ३२	७४३.०० ९७८.०८	६९७३७१.००	४७२८३९.००	४७२८३९.००	-	मंजूर

II 33

सी ३-४ विभाग

१०	५६५-५६७-५७१ जे. एस. एस. मार्ग	चौथा / मंडळ	तळ +४ + ३ पार्ट / २३ +७ = ३०	१०८९.४९ / १००८.२९	१०९८५३१.००	२८४३९०.००	२८४३९०.००	९०४१.००	मंजूर
११	४९-५१ ट्रिनिटी स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ +२ / ५ + ३ = ८	२४७.४४ / १३७६.७०	३४०६५३.००	२६६४२१.००	२६६४२१.००	९३२१३.००	मंजूर

डी-१ विभाग

१२	२५-२५ अे, एम. के. रोड	दुसरा/सु. / मंडळ	तळ +४ / ५ +१ = ६	१६८६.१७ / ९९९.०८	१६८४६२७.००	१३२७२७५.००	१३२७२७५.००	--	मंजूर
१३	१३ लेबर्नम लेन	पहिला / मंडळ	तळ +३ / १० +० = १०	१५६६.१६ / ३२७.२६	५१२५५२.००	५१२५५२.००	५१२५५२.००	-	मंजूर

डी -२ विभाग

१४	३७२-३७८ एम.एस. अली रोड	चौथा / मंडळ	तळ + ४ / २५ + १० = ४५	४२२४.०० / ११४३.४१	४८२९४९८.००	१००१६६८.००	१००१६६८.००	--	मंजूर

1232

1,39,95,240